संक्षीप्त फौ.ख नं. ८०० / १३

## निशाणी १ खालील आदेश

१. प्रस्तुतची केस फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २(ड)नुसार तक्रार स्वरूपाची आहे. सदरची तक्रार रे.सु.ब.कडुन रेल्वे कायदयानुसार दाखल करण्यात आली आहे. प्रस्तुत केस मधील आरोपीची वैयक्तीक जातमुचलका / रोख जामीन वर सुरुवातीलाच मुक्तता करण्यात आली आहे.

२. अभिलेखाचे अवलोकन केले असता तक्रारदार व आरोपी दोघेही गैरहजर असल्याचे निदर्शनास येते. दोन्हीही पक्षांना प्रस्तूतची केस प्रलंबीत असल्याचे माहित असुन दोन्हीही पक्ष प्रस्तूत केसच्या नेमलेल्या तारखांना गैरहजर राहिले आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की दोन्हीही पक्षांना प्रस्तूतची केस पुढे चालवायची नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुतची केस प्रलंबीत ठेवणे न्यायोचीत ठरणार नाही. म्हणून खालील आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. प्रस्तुतची केस फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५६ नुसार काढून टाकण्यात येते.

२. आरोपीला सोडून देण्यात येते.

३. आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका रदद् करण्यात येतो.

४. जर आरोपीने रोख जामीने दिला असेल तर रोख रूपये /- सरकार जमा करण्यात यावे.

( अनिरुध्द पाठक )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
लोहमार्ग न्यायालय, दौंड.

दौंड.
दिनांक ०७/०४/२०१६